रे.दि.मु.क्र.१६/२०२१
आण्णाप्पा वि. सरोजिनी

## अर्ज नि.१६ खालील आदेश

प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज सि.स.क्र.१४३२ व १४३३ ची एकत्रीत मोजणी मा. उपअधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, गडहिंग्लज यांचेकडून होवून मिळणेकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश क्र.२६, नियम ९ प्रमाणे दाखल केला आहे.

२. प्रतिवादीने असे कथन केले आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द कायम मनाई व आदेशात्मक मनाई ताकिदीकरीता दाखल केला आहे. सि.स.क्र.१४३२ व १४३३ या मिळकती दरम्यान सामाईक भिंत, जिना व शौचालय टाकी असल्याचे कथन वादीने केले आहे. परंतू प्रतिवादीने तिचे कैफियतीमध्ये असे कथन केले आहे की, सि.स.क्र.१४३३ चे दक्षिणोत्तर बांधलेली भिंत तसेच जिना व शौचालय टाकी हे सि.स.क्र.१४३३ चे हद्दीत आहे. त्यामुळे दावामिळकत म्हणून वर्णन केलेल्या सि.स.क्र.१४३२ व १४३३ या मिळकती दरम्यान असलेली दक्षिणोत्तर भिंत, जिना व शौचालय टाकी यांची वस्तुस्थिती मे. न्यायालयासमोर येण्याकरीता उपअधिक्षक, भूमि अभिलेख, गडहिंग्लज यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक होण्याकरीता प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे (नि.१९) दाखल केले आहे. वादीचे कथन असे की, प्रस्तुत अर्जातील संपूर्ण मजकूर खोटा व

लबाडीचा आहे. वादीने नमूद केलेली दक्षिणोत्तर सामाईक भिंत, सामाईक जिना व सामाईक शौचालय टाकी वादीचे सि.स.क्र.१४३२ व प्रतिवादी यांचे सि.स.क्र.१४३३ या मिळकतीमध्ये असून त्याकरीता वादी व प्रतिवादी यांचे मालकीची साडेचार इंच रुंदीची व अंदाजे ३३ फुट लांबीची जागा घेवून सामाईक भिंत बांधली आहे. त्यापुढील सामाईक जागेत शौचालय टाकी बांधून त्यातूनच पिलर घालून जिना सामाईक जागेत फिरविला आहे. सदर बांधकामाचा खर्च वादी व प्रतिवादी यांनी निम्मा—निम्मा केला आहे. सामाईक भिंतीचे नोटराईज करारपत्र व सामाईक जिना व शौचालय टाकी याबाबतचे पावतीवजा करारपत्र वादीने हजर केले आहे. प्रतिवादीचा प्रस्तुत अर्जाद्वारे पुरावा गोळा करण्याचा उद्देश आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

४. वादी व प्रतिवादीचे परस्पर विरोधी कथनांवरून खालील वादप्रश्न माझे विचारार्थ निर्माण झाले असून सदरचे वादप्रश्न व त्यांचे निष्कर्ष त्यांचे कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत—

| **अ.क्र.** | **<u>वादप्रश्न</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १. | कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती वादातील मुद्दयांचे निराकरण करणेसाठी गरजेची आहे का? | **होकारार्थी** |
| २. | कोणता आदेश? | **अर्ज मंजूर केला.** |

## कारणमिमांसा

### वादप्रश्न क्र. १ व २:—

५. वादी आणि प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादी आणि प्रतिवादी यांनी अभिलेखावर दाखल केलेल्या कागदपत्रांची काळजीपूर्वक पडताळणी केली.

६. प्रतिवादीने दाखल केलेला खालील न्यायनिर्णय बारकाईने

वाचला —

**Dhondiram Nivrutti Pawar V/s Laxman Khashaba Pawar (LAWS (Bombay) 2010 01 243)**

The honorable Bombay High Court held that, the cases of boundary dispute are clearly distinguishable in which the identity of land, measurement thereof and area of the land is needed to be considered preferable on the basis of the authentic evidence and map of the land drawn by competent public official on behalf of the central or state government, the trial court is benefited by such map of the land authentically drawn and produce in order decide the suit correctly, effectively and finally in the larger interest of justice so that no such dispute shall remain pending in courts for long time in respect of alleged encroachments over the suit property.

वादीने दाखल केलेल्या न्यायनिर्णयाचे बारकाईने अवलोकन करता प्रस्तुत न्यायनिर्णयातील वस्तुस्थिती आणि सदरील अर्जातील वस्तुस्थिती या सुसंगत असल्याने वरील न्यायनिर्णय प्रस्तुतचे अर्जास लागू होतो.

७. वादी आणि प्रतिवादीचे कथनांचे बारकाईने अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द कायम मनाई ताकिदीकरीता आणि प्रतिवादीने सामाईक जिन्यात बसविलेले ग्रिल्स काढून घेण्यासाठी आदेशात्मक मनाई ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. वादी व प्रतिवादी यांना मान्य आहे की, सि.स.क्र.१४३२ ही मिळकत वादीचे मालकी वहिवाटीची आहे आणि सि.स.क्र.१४३३ ही मिळकत प्रतिवादीचे मालकी

वहिवाटीची आहे. सि.स.क्र.१४३२ व १४३३ हया मिळकती एकमेकांलगत आहेत. दोन्ही मिळकतींमध्ये एकच सामाईक दक्षिणोत्तर भिंत आहे. प्रतिवादीने सि.स.क्र.१४३३ मध्ये सन २०१३ साली बांधकाम केले असून वादीने सन २०१६ मध्ये सि.स.क्र.१४३२ मध्ये बांधकाम केले आहे.

८. वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान सामाईक दक्षिणोत्तर भिंत, सामाईक जिना व शौचालय टाकी यावरुन वाद उपस्थित झालेला आहे. अशा परिस्थीतीत सामाईक दक्षिणोत्तर भिंत, सामाईक जिना व शौचालय टाकी कोणाच्या हद्दीत आहे ही वस्तुस्थिती मे. न्यायालयासमोर येण्याकरीता मोजणी होणे आवश्यक आहे. सि.स.क्र.१४३२ व १४३३ या मिळकतींची एकत्रीत मोजणी झाल्याखेरीज वाद संपुष्टात येणार नाही तसेच पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी अर्ज मंजूर करणे न्यायोचित होणार आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही कारण वादीला अहवालावर पुरावा देण्याची संधी आहे. त्यामुळे वादप्रश्न क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून वादप्रश्न क्र.२ ला उत्तर देताना खालील आदेश पारीत करीत आहे –

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर केला. |
| २. | उपअधिक्षक, भूमि अभिलेख, गडहिंग्लज यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करणेत येते. |
| ३. | कोर्ट कमिशनर यांनी प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे सि.स. क्र.१४३२ आणि सि.स.क्र.१४३३ या मिळकतीची एकत्रीत मोजणी करुन या मिळकतीदरम्यान असलेली दक्षिणोत्तर भिंत, जिना आणि शौचालय टाकी याच्या मोजमापासह मोजणी नकाशा व पंचनामा तयार करुन तसा अहवाल या |

| | |
|---|---|
| | न्यायालयामध्ये तीस दिवसाच्या आत सादर करावा. |
| ४. | प्रतिवादीने कोर्ट कमिशनर यांची नियमाप्रमाणे होणारी योग्य ती कमिशन फी संबंधीत कार्यालयात जमा करुन त्याप्रमाणे चलन प्रस्तुत दाव्याचेकामी हजर करावे. |
| ५. | प्रतिवादीने कोर्ट कमिशनर यांना लागणारी योग्य ती कागदपत्रे द्यावी. |
| ६. | प्रतिवादीने योग्य ती पूर्तता ताबडतोब करणेची आहे. |
| ७. | प्रतिवादीने योग्य ती पूर्तता केल्यानंतर कमिशन रिट अदा करावे. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Bhanupriya Ashok Durgawade
Date: 2021.02.03 15:54:18 +0530

दिनांक—०३.०२.२०२१

**(कु.बी.ए.दुर्गवडे)**
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज.

## **Certificate**

I affirm that the contents of this PDF file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. G.S.Shinge |
| Court | 2nd Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Gadhinglaj |
| Date | 03-02-2021 |
| order signed by the P.O. on | 03-02-2021 |
| order uploaded on | 03-02-2021 |